दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक २९७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२० जानेवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

हनुमान कोळीवाड्याचे ग्रामस्थ रोखणार जेएनपीटीचा समुद्र मार्ग

दै.रायगड नगरी । जेएनपीटी

मागील ३२ वर्षापासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाड्याचे नव्याने पुनर्वसन न केल्याने या कोळीवाड्यातील ग्रामस्थ गुरूवार (दि.२१) जेएनपीटीचा समुद्री मार्ग रोखणार आहेत. जेएनपीटी बंदरात येणारी जहाजे ज्या चॅनल मधून बंदरात येतात त्या चॅनलमध्ये आपल्या होड्या आडव्या टाकून जेएनपीटीत येणारी जहाजे रोखणार आहेत. हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थ, स्थानिक मच्छिमारांकडून हे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला स्थानिक प्रकल्पग्रस्त आणि वाढवण बंदराचे प्रकल्पग्रस्त देखिल पाठिंबा देणार असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

जेएनपीटी वसविण्यासाठी हनुमान कोळीवाडा हे गाव उठविण्यात आले होते. मात्र या गावाचे शासकीय मानकांनुसार पुनर्वसन करण्यात आले नाही. १७.५ हेक्टर जागेवर पुनर्वसन करणे गरजेचे असताना फक्त साडेचार हेक्टर जमिनीवर ते सुध्दा वाळवीच्या जागेवर पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यामुळे संपुर्ण गावात घरांना वाळवीने पोखरले आहे. त्यामुळे शासनाच्या नियमानुसार १७ हेक्टर जागेवर आणि सोयी सुविधा असलेल्या जागेवर आमच्या गावाचे पुन्हा पुनर्वसन करावे अशी मागणी सातत्याने हे ग्रामस्थ करत आहेत. यासाठी केंद्र सरकार पासून राज्यसरकारचे उंबरठे झिजवले मात्र त्याना न्याय मिळाला नाही.

आत्ता या ग्रामस्थांनी आरपारची लढाई लढण्याचा निर्णय घेतला असून येत्या गुरूवार पासून समुद्रात जेएनपीटीची कोंडी करण्यात येणार आहे. जेएनपीटीत येणारी जहाजांच्या मार्गात मच्छिमारांच्या बोटी आडव्या घालून समुद्र अडवणार आहेत. सुमारे १००० ते १२०० बोटी या आंदोलनात सहभागी होतील असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. बेमुदत हे आंदोलन चालू राहणार आहे.

हे आंदोलन मागे घ्यावे यासाठी रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र शासनातर्फे सर्व सहकार्य हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले मात्र जेएनपीटी प्रशासन या बाबत हात झटकत आहे. दरम्यान उरण तहसिलदार आणि पनवेलचे प्रांताधिकारी या बाबत मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या भक्कम एकजुटीचा हा विजय : माजी न्यायमूर्ती बी.जी.कोळसे पाटील

रिलायन्स नागोठणे प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांना मिळणार नोकरी

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

जनशक्ती जगातील सर्वात मोठी शक्ती आहे. हुकूमशहाला देखील झुकवण्याचे सामर्थ्य जनशक्तीत आहे. आमचा लढा हा शांतता, अहिंसा व संविधानिक मार्गाने असतो. आम्ही जेल व मरणाला कधीही भिणारे नाहीत. जनशक्तीच्या बळावर कोणताही लढा आम्ही जिंकू शकतो हा विश्वास आम्हाला आहे. रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या भक्कम एकजुटीचा हा विजय असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांनी केले.

लोकशासन आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पी बी सावंत व उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्य राज्य संघटक राजेंद्र गायकवाड यांच्या लढाऊ व संयमी नेतृत्वाखाली रिलायन्स नागोठणे प्रकल्पग्रस्त , स्थानिक भूमिपुत्र, नलिकाग्रस्त, वारस, कंत्राटी कामगार यांनी दि. (२७) नोव्हेंबर पासून आंदोलन पुकारले होते. रिलायन्स नागोठणे कंपनी व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेत पहिल्या टप्प्यात ३५१ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणार असून टप्प्याटप्प्यात इतर प्रकल्पग्रस्तांना सामावून घेणार असल्याचे आश्वासन प्रशासनाच्या मध्यस्तीने दिले. तसेच कंत्राटी कामगारांना देखील रिलायन्स व्यवस्थापनाने नोकरीत सामावून घेण्याबाबतचे पत्र प्रांताधिकारी यांनी रिलायन्सला दिले आहे. तसेच येथील स्थानिक शिक्षित, उच्चशिक्षित तरुणांना देखील नोकरीत प्राधान्य मिळणार असल्याचे यावेळी बी जी कोळसे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. ५३ व्या सोमवारी दि.(१८) रोजी माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन स्थगित करण्यात आले. कोळसे पाटील पुढे म्हणाले की रायगडची भूमी ऐतिहासिक व क्रांतिकारी भूमी आहे. या मातीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य आप्पासाहेब नारायण नागु पाटील यांच्या कुळकायद्यासारख्या लढ्यातून प्रचंड प्रेरणा व ऊर्जा मिळते. आपल्या न्यायहक्कांसाठी कायम जागृत संघटित व एकजूट रहा असे आवाहन यावेळी कोळसे पाटील यांनी केले. दरम्यान आंदोलकांना दिलेल्या आश्वासनात मागे पुढे फसवणूक झाल्यास याच ठिकाणी एक लाखाहून अधिक कार्यकर्त्यांचे व्यापक स्वरूपाचे आंदोलन पुन्हा उभे करू असा इशारा कोळसे पाटील यांनी दिला.

यावेळी रोहा प्रांताधिकारी यांनी रिलायन्स नागोठणे व्यवस्थापन यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की दि. ३१/१२/२०२० रोजी खा.सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हाधिकारी अलिबाग यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या बैठकीमधील चर्चेअंती ठरलेल्या निर्णयानुसार आंदोलनात सहभागी असलेल्या व यापूर्वी कंत्राटी तत्वावर काम करीत असलेल्या कामगारांना कामावर रुजू करून घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे .../२

संक्षिप्त...

लवकरच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र दिसणार

दै.रायगड नगरी । मुंबई

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे लवकरच एकत्र दिसणार आ-हेत. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याच्या अना-वरणाचा कार्यक्रम २३ जानेवारीला दक्षिण मुंबईत होणार आहे. मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी या कार्यक्रमाचं आमंत्रण राज ठाकरेंना दिलं आहे. या कार्यक्रमाला राज ठाकरे उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्याआधी मे महिन्यात राज्यातील कोरोना स्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी सर्वपक्षीय नेत्यांची मंत्रालयात बैठक बोलावली होती. मात्र त्या बैठकीला उद्धव ठाकरे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित होते. महापौर किशोरी पेडणेकर यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. 'बाळासाहेबांच्या पुतळ्याचं अनावरण २३ जानेवारीला होणार आहे. या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरेंची भेट घेतली. घरी आलेल्या पाहुण्यांचं अगत्य करणं हे ठाकरे कुटुंबाचं वैशिष्ट्य आहेत. कृष्णकुंजवर त्याचा अनुभव आला. राज ठाकरेंनी आमच्यासोबत १०-१२ मिनिटं संवाद साधला. बाळासाहेबांच्या अनेक आठवणी त्यांनी आम्हाला सांगितल्या,' असं पेडणेकर राज ठाकरेंच्या भेटीनंतर म्हणाल्या.

जमीन विकणे आहे

पाली-खोपोली मार्गावर नानोसे गावाजवळील पेट्रोल पंपाच्या समोर असलेली रोड टच २१ गुंठे शेतजमीन जागा विकणे आहे.

संपर्क : 8108618486

मतदार जनजागृतीसाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करुया : उपजिल्हाधिकारी वैशाली माने

दै.रायगड नगरी । अलिबाग

दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर यावर्षी ११ वा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येत असून, मतदार जनजागृतीसाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करु या, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती वैशाली माने यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय मतदार दिनाच्या नियोजनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात विविध शासकीय विभागांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीस उपजिल्हाधिकारी श्रीमती माने यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व विषद करताना मा.निवडणूक आयोगाच्या सूचनांबद्दल उपस्थित सर्वांना माहिती दिली. प्रत्येक कार्यालयात मतदार जागृती फोरम कार्यान्वित करुन त्या माध्यमातून मतदार जनजागृती, नव मतदार नोंदणी याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न व्हावेत तसेच समाजातील सर्व स्तरांमध्ये मतदार जागृती होणे अपेक्षित आहे, असेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनातील सर्व यंत्रणा व विभाग राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहाने साजरा करतील. सर्व विभागांच्या एकत्रित प्रयत्नातून मतदार जागृती उत्तमरित्या होईल, असा विश्वास श्रीमती माने यांनी शेवटी व्यक्त केला.

या बैठकीस जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक किर्ती शेडगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, सहाय्यक निबंधक डॉ.स्मिता गायकवाड, सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास श्री.शा. गि.पवार, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजीव तांभाळे, गट विकास अधिकारी दिप्ती देशमुख, अप्पर कोषागार अधिकारी दिपक राऊळ, क्रीडा अधिकारी सचिन निकम, समाज कल्याण विभागाचे अनिल मोरे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अधीक्षक श्री.लालचंद कुंभार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी चंद्रकांत जाधव, पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आझाद जाधव, सहायक गट विकास अधिकारी कैलास चौलकर, दुय्यम निबंधक पराग भातखंडे, उप वन संरक्षक कार्यालय अधीक्षक श्री.परतेकर, अजित पवार, सहायक प्रकल्प अधिकारी राजाराम मोरे, जिल्हा हिवताप कार्यालयाचे श्री.वर्तक यांची उपस्थिती होती.

महावितरणचा ग्राहकांना शॉक ; ... अन्यथा विद्युत पुरवठा खंडीत होणार

दै.रायगड नगरी । मुंबई

वीजबिल वसुलीची मोहीम राबवून थकबाकी वसुल करण्याचे व थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा त्वरित खंडित करण्याचे आदेश महावितरणने सर्व क्षेत्रिय कार्यालयास दिले आहेत.

डिसेंबर २०२० अखेर राज्यात एकूण ६३ हजार ७४० कोटी रुपयांची थकबाकी असून यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. आता जर ग्राहकांनी वीज बिल भरले नाही तर वीज पुरवठा खंडित करण्याशिवाय महावितरणसमोर पर्याय उरलेला नाही.

डिसेंबर अखेर राज्यातील कृषिपंप ग्राहकांकडे ४५ हजार ४९८ कोटी रुपयांची थकबाकी आहे तर वाणिज्यिक, घरगुती व औद्योगिक ग्राहकांकडे ८४८५ कोटी रुपये व उच्चदाब ग्राहकांकडे २४३५ कोटी रुपयांची थकबाकी आहे.

राज्यात मार्च २०२० मध्ये कोविड १९ मुळे लॉकडाऊनच्या काळात थकबाकीपोटी वीज पुरवठा खंडित न करण्याचा महावितरणने निर्णय घेतला होता व उर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा डिसेंबर अखेरपर्यंत खंडित न करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या.

थकबाकीदार ग्राहकांना वीज बिल सुलभ हत्यामध्ये भरण्याची सवलत महावितरणने दिलेली आहे. सोबतच थकबाकीवर विलंब आकार न लावण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे. तसेच ग्राहकांच्या वीज बिलासंबंधी तक्रारी असल्यास त्या तात्काळ सोडविण्याचे आदेश सुद्धा दिलेले आहेत.

लॉकडाऊनच्या काळात खाजगी वीज वितरण कंपन्यांनी थकबाकी वसुल करण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची रीतसर .../२

तळा पुन्हा हादरला; मुलाने केली बापाची ठेचून हत्या

दै.रायगड नगरी । तळा

किरकोळ कारणावरुन एका तरुणाने आपल्या बापाची चोपण्याने ठेचून हत्या केल्याची धक्कादायक घटना तळा येथे घडली आहे. गेल्याच महिन्यात तळा येथे दोन हत्या झाल्या होत्या.

तालुक्यातील वरळ येथील भागूराम काप (५५) आणि त्याचा मुलगा भावेश (३१) यांच्यासोबत राहतो. घरातील इतर मंडळी कामानिमित्त मुंबईमध्ये राहतात. सोमवारी (१८ जानेवारी) रात्री या दोघांमध्ये किरकोळ वाद झाला. भावेश वडिलांकडे त्याचा मोबाईल मागत होता. ते देत नसल्यामुळे दारुच्या नशेत असलेल्या भावेशने घरातील चोपण्याने वडिलांवर हल्ला केला. यात त्यांचा मृत्यू झाला.

भागुराम यांचे मित्र, शेजारी यांनी भावेशकडे वडिलांची चौकशी केली असता, त्याने घडलेली घटना सांगितली.

मोठा अनर्थ झाल्याचे लक्षात येताच या शेजार्यांनी ही माहिती गावचे अध्यक्ष, पोलीस पाटील व त्यानंतर तळा पोलिसांच्या निदर्शनास आणून दिली. पोलिसांनी भावेशला ताब्यात घेतले आहे.

कृषी कायद्याविरोधातील शेतकऱ्यांच्या आंदोलनात शरद पवार उतरणार

दै.रायगड नगरी । मुंबई

केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आणलेल्या कृषी कायद्यांविरुद्ध दिल्लीत शेतकऱ्यांचं बेमुदत आंदोलन सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही शेतकऱ्यांसाठी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीतील शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईत तीन दिवसांचे आंदोलन होत असून या आंदोलनात शरद पवार सहभागी होणार आहेत.

दिल्लीतील शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी २३, २४ व २५ जानेवारी रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे शेतकरी आंदोलन होणार आहे. या शेतकरी आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे २५ जानेवारी रोजी सहभागी होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी आज दिली. मलिक यांनी या मागची पक्षाची भूमिकाही स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेसने कृषी कायद्यांना विरोध केला असून शेतकरी आंदोलनाला राष्ट्रवादीने पाठिंबा दिलेला आहे. आता या आंदोलनात महाविकास आघाडी मधील तिन्ही पक्ष आणि त्यांचे नेते व स्वत: मुख्यमंत्री .../२

सुधागड तालुक्यातील पशुधन डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या प्रतीक्षेत

डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यात ५० हजाराहून अधिक पशुधन आहे. त्यांच्यासाठी येथे सहा पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. मात्र या दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची बहुतांश पदे रिक्त असल्याने. येथील जनावरांना व पशुपक्षांना वेळेत उपचार मिळत नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. शिवाय रिक्त पदांची जबाबदारी इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आल्याने त्यांच्यावरील कामाचा ताणही प्रचंड वाढत आहे. आणि त्यांना अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे.

सुधागड तालुक्यात पाली, जांभुळपाडा व चव्हाणवाडी येथे श्रेणी एक चे ३, तर वाघोशी, खवली व नांदगाव येथे श्रेणी दोन चे ३ असे सहा पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. यामध्ये १०० गावांसह वाड्यावस्त्यांचा समावेश होतो.

पालीमध्ये पंचायत समितीचे पशुसंवर्धन विभागाचे कार्यालय आहे. येथील आणि पाली पशुवैद्यकीय दवाखाना व चव्हाणवाडी येथील पशुधन विकास अधिकाऱ्यांचे प्रत्येकी १ पद रिक्त आहे. पाली पंचायत समिती व नांदगाव पशुवैद्यकीय दवाखाना येथे प्रत्येकी १ पशुधन पर्यवेक्षकपद रिक्त आहे. .../२

धक्कादायक आणि लाजिरवाणे

रिपब्लिकन वाहिनीचे सर्वेसर्वा असलेले अर्णव गोस्वामी आणि 'बार्क'चे तत्कालिन प्रमुख पार्थो दासगुप्ता यांच्यातील व्हॉट्सॲप संदेशांची झालेली देवाणघेवाण हे फक्त संबंधितांमधील संभाषण नसून, देशातील सर्वोच्च सत्ताकेंद्राच्या जवळ असलेल्या व्यक्ती अशा सर्व कृत्यांना कसा पाठिंबा देतात, याचे निदर्शक मानले गेले पाहिजे. गेल्या काही वर्षांमध्ये, विशेष करून भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आल्यानंतर गोस्वामी आणि त्यांच्या वाहिनीची झालेली वेगवान प्रगती कशी झाली, याची कथाच या संभाषणातून कळते. इतकेच नव्हे, तर आपले वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी एखादी वाहिनी व तिचा प्रमुख किती खालची पातळी गाठू शकतो, हेदेखील यातून स्पष्ट होते आहे. टीव्ही वाहिनी यशस्वी करायची असेल, तर टीआरपी, म्हणजे किती लोक ती बघतात, याची आकडेवारी महत्त्वाची ठरते. त्यातून त्या वाहिनीची लोकप्रियता व विश्वासार्हता स्पष्ट होतेच; पण आर्थिक हितही साधले जाते. ते साधण्यासाठी त्याच्या पाहणीचे आकडेच स्वतःच्या सोईनुसार बदलून घेण्याचा उपद्व्याप गोस्वामी यांनी केला. त्याला दासगुप्ता यांनी साथ दिली; पण हे फक्त तेवढ्यावरच थांबले नाही, तर हे युद्ध जिंकण्यासाठी देशाच्या संरक्षणविषयक गुप्त माहितीचा उपयोगही केला गेला. भारत, पाकिस्तानवर हल्ला करणार असल्याची माहिती, प्रत्यक्ष हल्याच्या अगोदरच गोस्वामी यांना कशी कळते आणि ते ती माहिती बेधडकपणे आपल्या वर्तुळात कशी सांगतात, हेच यातून स्पष्ट झाले आहे. इतकेच नव्हे, तर त्या घटनेचे सर्वप्रथम वार्तांकन केल्याने, आता आपली वाहिनी प्रतिस्पर्ध्यांपेक्षा कशी सरस आहे, याचेही वर्णन करतात हे पाहिले, की तळपायाची आग मस्तकात गेल्याशिवाय राहत नाही. त्यांना ही माहिती देणारे उच्चपदस्थ कोण आहेत, याचाही शोध घेणे तितकेच गरजेचे आहे. राजधानी दिल्लीत अत्यंत प्रभावशाली आणि विघातक सत्ताकेंद्रे पूर्वी बनलीही असतील; मात्र गोस्वामी यांच्या व्हॉट्सॲप संभाषणांचा जो भयंकर आणि लांच्छनास्पद तपशील बाहेर आला आहे, त्यावरून नव्या गिधाडांनी नवी सत्ताकेंद्रे कशी बनवली व काबीज केली आहेत, हे लक्षात येते. ही सत्ताकेंद्रेही तितकीच विघातक आणि देशहितावर स्वार्थाचे निखारे ठेवणारी आहेत. केंद्र सरकार असल्या तोंडपुज्या अरेरावांवर काय कारवाई करते, हे आता दिसेलच आणि तशी ती केली नाही, तर काँग्रेस राजवटीत जन्माला आलेल्या अनेक क्षेत्रांतील रॅकेट्सना नावे ठेवण्याचा काहीही नैतिक अधिकार दोन अंगुळे वर चालणाऱ्या भारतीय जनता पक्षाला राहणार नाही. व्हॉटसॲपवरील सारे संभाषण कसे महाजालात टिकून राहते आणि टिपता येते, हे मुंबई पोलिसांच्या या कारवाईमुळे स्पष्ट झाले, हा आनुषंगिक लाभ असला, तरी मुंबई पोलिसांच्या या कारवाईचे स्वागतच करायला हवे. खऱ्याखुऱ्या लोकशाहीत बेकायदा धंदे करणारा कुणीही 'पवित्र गाय' असू शकत नाही. मग ते नेते असोत, पत्रकार असोत, नोकरशहा असोत, की अगदी न्यायाधीशही. 'ब्रॉडकास्ट ऑडियन्स रिसर्च कौन्सिल', म्हणजे 'बार्क' या देशातील वाहिन्यांचा टीआरपी मोजणाऱ्या संस्थेत अर्णव गोस्वामी आणि त्यांच्या 'रिपब्लिक' या वाहिनीने काय घोटाळे केले, हे मागेच उघड झाले आहे. या संभाषणाचे मोहोळ फुटल्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी भारतावर टीका केली आहे आणि बालाकोट येथील हवाई हल्ला हा भाजप सरकारने निवडणुका डोळ्यांसमोर ठेवूनच केला होता, हा जुनाच आक्षेप नव्याने घेतला आहे. त्याला उत्तर देताना आता अर्णव गोस्वामी यांनी अति-राष्ट्रवादी भूमिका घेऊन ज्या भाषेत तोंड सोडले आहे, तशी भाषा कोणताही पत्रकार एका राष्ट्रप्रमुखाशी बोलताना वापरणार नाही; मात्र आता हा विषय भारत विरुद्ध पाकिस्तान करून मूळ साऱ्या मुद्द्यांना बगलच द्यायची, असा डाव दिसतो. एकदा ती चर्चा सुरू झाली, की आपल्या लांड्यालबाड्या झाकल्या जातील, हा अर्णव गोस्वामी यांचा प्रयत्न दिसतो. तो यशस्वी होता कामा नये. दासगुप्ता आणि गोस्वामी यांच्या संभाषणात टीआरपी, इतर वाहिन्या हे तर येतेच; पण दासगुप्ता यांची पुढची पीएमओमध्ये उडी घेण्याची इच्छाही दिसते. ती त्यांनी गोस्वामी यांच्या कानावर घालावी, याचा अर्थ तेथे त्यांचे ऐकून घेणारे कुणी तरी असणार. आपल्याला सत्ताधाऱ्यांचा आशीर्वाद असल्याने आपण काहीही करू शकतो, असा जो मस्तवाल माज या संभाषणांमधून दिसतो आहे, तो अधिक आक्षेपार्ह आहे. काँग्रेस; तसेच इतरही विरोधी पक्षांनी, संयुक्त संसदीय समिती नेमून या साऱ्या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. मोदी सरकार ती मान्य करण्याची शक्यता कमीच आहे; पण निदान हे बाहेर आलेले संभाषण बघितल्यानंतर आपल्या पक्षाचा अजेंडा घेऊन बेछूट नाचणारी ही भुतावळ एक दिवस आपल्याही डोक्यावर बसेल, एवढे जरी आकलन आले, तरी खूप झाले.

स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण उपयुक्त : अतुल बोरा

दै.रायगड नगरी । शिस्ते

आजच्या बदललेल्या जीवनशैलीत व्यक्ती आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. नियमित व्यायाम शरीर सदृढ ते साठी आवश्यक आहे. कराटे हा खेळ खेळाडूच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणतो. स्वसंरक्षणासाठी कराटे हा खेळ सदैव उपयुक्त ठरलेला आहे असे प्रतिपादन कराटे प्रशिक्षक अतुल बोरा यांनी केले. श्रीवर्धन मधील शिव रुद्र अकॅडमी या संस्थेने श्रीवर्धन मधील विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय कराटे प्रशिक्षणाचे आयोजन रविवारी ता. १७ रोजी केले होते त्यावेळी ते बोलत होते.

सदर प्रशिक्षणासाठी मुख्य प्रशिक्षक अतुल बोरा यांनी सकाळी साडेआठ ते दुपारी साडेबारा या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना कराटेच्या विविध बाबी प्रत्येक प्रात्यक्षिका द्वारे समजावून सांगितल्या. त्यानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना अतुल बोरा यांनी सांगितले कि, निरोगी आयुष्य जगण्यासाठी नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे. आपण खेळत असलेला कराटे खेळ तुम्हाला विविध खेळात क्षेत्रात उपयोगी पडणार आहे. कबड्डी, खोखो, क्रिकेट या सर्व खेळांमध्ये पारंगत होण्यासाठी कराटे सराव निश्चितच उपयोगी ठरत आहे. आज कराटे खेळात विविध पद्धतींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याशिवाय शाळेकडून होणाऱ्या स्पर्धेद्वारे तुम्ही चांगले यश प्राप्त केल्यास तुम्हास त्याचा शैक्षणिक तसेच नोकरी धंद्यासाठी उपयोग होणार आहे तुम्ही पूर्ण एकाग्र पणे नियमित सराव व ध्यान केल्यास त्याचा फायदा तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निश्चितच होणार आहे, असे अतुल बोरा यांनी सांगितले. सदरच्या प्रशिक्षणासाठी श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन शहर, बोर्लीपंचतन, जसवली व सातारा जिल्ह्यातून विद्यार्थी आले होते. शिव रुद्र अकॅडमीचे प्रशिक्षक शैलेंद्र ठाकूर, अमित गडांकुष, देविदास माने, प्रवीण रिसबुड उपस्थित होते.

> श्रीवर्धन येथील झालेल्या कराटे प्रशिक्षणामध्ये अनेक बाबी शिकायला मिळाल्या त्याबद्दल आनंद आहे. स्व संरक्षणात कराटे निर्णायक भूमिका बजावू शकते याचा विश्वास आहे.
>
> **- मंजिरी वैद्य, विद्यार्थीनी कराटे**

पालीतील शिवछत्रपती शिवाजी स्मारकाची साफसफाई व स्वच्छता

शिवऋण प्रतिष्ठानमार्फत सुरू आहे शिवपूजा; परिसर प्रसन्न व शिवमय

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील पाली येथील शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची स्वच्छता व साफसफाई नुकतीच करण्यात आली आहे. याबरोबरच शिवऋण प्रतिष्ठानतर्फे येथे रोज शिवपूजा देखील करण्यात येते. परिणामी हा संपूर्ण परिसर प्रसन्न व शिवमय झाला आहे. छ. शिवाजी महाराज यांच्या आदर्श कार्यप्रणाली व राज्यकारभाराची सातत्याने स्मरण व्हावे व प्रेरणा मिळावी यासाठी शिवऋण प्रतिष्ठान सातत्याने विविध उपक्रम राबविण्याचे काम करीत आहे. पालीतील स्मारकाच्या स्वछता व देखभालीकडे तरुणाईने लक्ष वळवले आहे.

येथिल वाढलेले गवत आणि आजुबाजुचा परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे सुधागड तालुकाध्यक्ष अमित निंबाळकर यांनी ग्रास कटिंग मशीनने अतिशय आकर्षकपणे गवत कापले आहे.

तसेच शिवप्रेमींनी हा परिसर पूर्ण स्वच्छ केला आहे. शिवऋण प्रतिष्ठान मार्फत येथे रोज शिवपूजा केली जाते. व साफसफाई देखील करण्यात येते. या शिवपूजेच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन शिवऋण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष केतन म्हसके यांनी केले आहे.

कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची सर्वसाधारण सभा संपन्न

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची सर्व साधारण सभा कोकण विभागाचे अध्यक्ष सतिश वैरागी यांच्या निवासस्थानी पार पडली. यावेळी कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभे मार्फत वर्षभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून ते मोठ्या उत्साहात असंख्य तेली बंधू-भगिनी यांच्यासमवेत राबविले जातात.

गेल्या वर्षी जरी कोरोना ने मोठा आहाकार माजविला होता. अशा काळातही ऑनलाइन पद्धतीने विविध कार्यक्रम राबविले गेले असल्याचे या सभेत कोकण विभाग महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेचे कोकण विभागाचे अध्यक्ष सतीश वैरागी यांनी यावेळी सांगितले.

या सभेस महाराष्ट्र प्रांतिक तैलिकचे कार्याध्यक्ष अशोककाका व्यवहारे, महासचिव प्रा.डॉ. भुषण कर्डिले, कोषाध्यक्ष गजानन ऊर्फ नाना शेलार, कोकण विभाग कार्याध्यक्ष गणेश धोत्रे, सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्ष एकनाथ तेली, रायगड जिल्हा (उत्तर विभाग) अध्यक्ष गणेश महाडीक व रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

तुफैल दामाद यांची टायगर फोर्सच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

दै.रायगड नगरी । कोर्लई

व्हेंचर फाऊंडेशनचे महाराष्ट्र महासचिव, वाहतूक सुरक्षा दल व नागरिक संरक्षक (आर.एस.पी.) संघटनेचे उपसमादेशक तथा टायगर फोर्सचे मुरुड तालुका अध्यक्ष तुफैल दामाद यांची राष्ट्रीय भ्रष्टाचार निरोधक एवं अत्याचार विरोधी संस्थान टायगर फोर्स)च्या रायगड जिल्हाध्यक्षपदी पदी नुकतीच नियुक्ती करण्यात आल्याबद्दल सर्वत्र कौतुक व समाधान व्यक्त होत आहे.

मुरुड शहरासह तालुक्यात सामाजिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात गेल्या वर्षांपासून व्हेंचर फाऊंडेशनमध्ये महाराष्ट्र महासचिव पदी, वाहतूक सुरक्षा दल व नागरिक संरक्षण (आर.एस.पी.) संघटनमध्ये व एक वर्षांपासून टायगर फोर्स संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आपले योगदान दिले आहे.

उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व तुफैल दामाद यांच्या कार्याची दखल घेऊन टायगर फोर्सचे राष्ट्रीय उपाध्यक्ष हरिराम मिश्रा, राष्ट्रीय महासचिव बडेबाबू सिंग, राष्ट्रीय महासचिव विक्रांत राऊळ, राष्ट्रीय सचिव हनुमंत नेमिष्टे, महाराष्ट्र अध्यक्ष भालचंद्र नलावडे, राष्ट्रीय सचिव के. डी.पाटील यांनी शिफारस करण्यात येऊन त्यांना पदोन्नती देण्यात येऊन टायगर फोर्सच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे ओळख व नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे. त्यांच्या या नियुक्तीचे संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, सदस्य,आप्तेष्ट, मित्रपरिवाराकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

शरद पवार यांच्या हृदयावरील जखम भरून काढा : ना.जितेंद्र आव्हाड

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

मीरा भाईंदरचे नगरसेवक ज्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून गेले त्याचवेळी मी, गणेश नाईक राष्ट्रवादी काँग्रेस सोडून जाणार असल्याचे ओळखले होते आणि शरद पवार यांना याबाबत कल्पना दिली होती, परंतु त्यांच्यावर पवारांचा प्रचंड विश्वास होता. काही काळातच नाईक यांनी राष्ट्रवादी सोडली. ही जखम पवार यांच्या हृदयावर आजही आहे. ही जखम भरून काढण्याचे काम महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केले. नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुका होणार असल्याने रविवारी, दि. १७ जानेवारी रोजी नवी मुंबई महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते.

विकास कशाला म्हणतात हे मला माहीत नाही, परंतु दुसऱ्याने केलेली कामे आपल्या नावावर कशी खपवायची हे जर शिकायचे असेल तर नाईकांकडे जाऊन शिका, असा टोला त्यांनी लगावला. प्रत्येक सभेला शरद पवार यांच्याशेजारी नाईक बसायचे, परंतु भाजपच्या पहिल्याच सभेत त्यांना खाली जागा मिळाली नाही. त्याचे वाईट वाटत असल्याचे सांगत त्यांच्यात स्वाभिमान उरलेला नसल्याची टीका त्यांनी केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे विकास करत आहेत. रस्त्याच्या रुंदीकरणावर आधारित एफएसआय देण्यात आलेला आहे. नवी मुंबईतील सुमारे तीन लाख लोकांना याचा फायदा होणार असून, पुनर्बांधणीसाठी चांगला एफएसआय मिळणार असल्याने विकासाच्या सर्व वाटा उघड्या झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या भक्कम एकजुटीचा हा विजय

सूचित केले आहे. यासंदर्भात जलद कार्यवाही करण्यात येईल असे प्रांताधिकारी यांनी यावेळी स्पष्ट केले. प्रांताधिकारी डॉ.यशवंत माने यांनी प्रत्यक्ष आंदोनस्थळी भेट देऊन आंदोलकांच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी प्रशासन योग्य ती भूमिका घेत राहील असे आश्वाशीत केले. लोकशासन आंदोलन संघर्ष समितीचे हे अभूतपूर्व यश असल्याचे म्हटले जातेय. ३५ वर्षाच्या प्रदीर्घ काळ चाललेल्या या लढ्याला लोकशासन आंदोलन संघर्ष समितीच्या पुढाकाराने न्याय मिळाला असल्याचे समाधान प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशासन आंदोलन संघर्ष समितीचे राज्य संघटक राजेंद्र गायकवाड, शशांक हिरे, गंगाराम मिनमीने, प्रमोदिनी कुथें, आदींनी मार्गदर्शन केले. आंदोलनकर्त्यांची भूमिका समजून घेऊन प्रशासन , व्यवस्थापन व आंदोलनकर्ते यांच्यात योग्य तो समन्वय साधून आंदोलनाला निर्णायक दिशा दिल्याबद्दल खा. सुनिल तटकरे यांचे देखील यावेळी आभार मानण्यात आले. आंदोलनस्थळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या नेतृत्वात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

... अन्यथा विद्युत पुरवठा खंडीत होणार

परवानगी घेऊन सप्टेंबर २०२० मध्ये थकबाकी वसुलीची मोहीम मुंबई व मुंबई उपनगरात चालू केली व थकबाकीपोटी अनेक ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत केला. मात्र उर्जामंत्री डॉ राऊत यांनी डिसेंबर अखेरपर्यंत थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित न करण्याचे महावितरणला निर्देश दिले होते. परंतु आता थकबाकीचा डोंगर वाढल्याने दैनंदिन कामकाज चालविणे महावितरणला शक्य होत नसल्याने, बँकांची व इतर देणी व कर्मचाऱ्यांचा पगार देणेही कठीण होत आहे.

ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणला वीज खरेदीसाठी पुरवठादारांना रोजच पैसे द्यावे लागतात. प्रचंड वाढलेल्या थकबाकीमुळे आता यापुढे थकबाकी वसुल करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना जानेवारीपासून मोहिम राबविण्याचे निर्देश महावितरणने दिले असून थकबाकी वसुलीत कसूर करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावरही कारवाईचे संकेतही दिले आहे. थकबाकीदार ग्राहकांनी आपल्या वीज बिलाचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

शेतकऱ्यांच्या आंदोलनात शरद पवार उतरणार

उद्धव ठाकरे हेसुद्धा सहभागी होणार आहेत, असे मंत्री नवाब मलिक यांनी सांगितले.

केंद्र सरकारने आणलेले कृषी कायदे अन्यायकारक असून हे कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी शेतकरी गेल्या ५५ दिवसांपासून दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत आहेत. सुप्रीम कोर्टाने या कायद्यांना स्थगिती दिली असून दुसरीकडे शेतकरी प्रतिनिधी आणि सरकारमधील चर्चा पुन्हा पुन्हा निष्फळ ठरत आहेत. या प्रश्नी तीढा कायम असतानाच देशभरातील शेतकऱ्यांना पाठिंबा वाढत आहे. त्याचाच भाग म्हणून मुंबईतील आझाद मैदानात तीन दिवस आंदोलन केलं जाणार आहे. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचा आणि राज्यातील सरकारचाही पाठिंबा असल्याचे स्पष्ट होत आहे. शेतकऱ्यांच्या बाजूने शरद पवार पहिल्यापासूनच ठामपणे उभे आहेत. याबाबत राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळातही शरद पवार सहभागी झाले होते. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचं ऐकलं पाहिजे. कठोर भूमिका सोडून चर्चेतून तीढा सोडवला पाहिजे, असे मत याआधीच शरद पवार यांनी मांडलेले आहे. आता तर पवार थेट आंदोलनातच उतरत असल्याने त्याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

पशुधन डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या प्रतीक्षेत

पाली व खवली पशुवैद्यकीय दवाखाना आणि पाली पंचायत समिती येथे प्रत्येकी १ शिपाई पद रिक्त आहे. याबरोबरच चव्हाणवाडी आणि पाली येथे ड्रेसर (व्रनोपचारक) चे प्रत्येकी १ पद रिक्त आहे.

अशी रिक्तपदे असल्याने खेड्यापाड्यातील आजारी पशुपक्षांना वेळेत उपचार मिळत नाहीत. तसेच लसीकरण व विविध योजना लोकांपर्यंत पोहोचत नाहीत. अनेक वेळा उपचार न मिळाल्याने पशूंना आपले प्राण गमवावे लागत आहेत. उपलब्ध कर्मचारी कामानिमित्त फिरतीवर असतात. त्यामुळे उपचारासाठी दवाखान्यात पशु व जनावर घेऊन येणाऱ्या लोकांना उपचाराविना मागे फिरावे लागत आहे. अतिरिक्त भार, कामाचे विविध ठिकाणी या मुळे येथील डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

तालुक्याला ४ पशुधन विकास अधिकाऱ्यांची तरतूद आहे. आणि सध्या फक्त पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ जांभूळपाडा येथील एकच पशुधन विकास अधिकारी जागा भरलेली आहे. आणि या अधिकाऱ्याकडे पशुवैद्यकीय दवाखाना पाली, पशुवैद्यकीय दवाखाना चव्हाणवाडी आणि तालुक्याचा पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पाली असे ३ अतिरिक्त कार्यभार तालुक्यात फक्त दोन पशुधन पर्यवेक्षक असून त्यांच्याकडे एक-एक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. शिपाई व व्रनोपचारक यांची पदे ९ असून ४ भरलेली आहेत ५ रिक्त आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

कुडतुडी ग्रामविकास मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यातील अतिशय डोंगराळ आणि दुर्गम अश्या ठिकाणी असणाऱ्या कुडतुडी येथील ग्रामस्थानी १९५६ साली कुडतुडी ग्राम सुधारणा विकास मंडळाची स्थापना केली. आजही हे मंडळ कार्यरत असून विविध समाजोपयोगी कार्यात अग्रेसर आहे. मंडळाच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, धार्मिक, आणि शैक्षणिक कार्यक्रम वर्षभर साजरे करून मंडळाचे नाव कायम स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. मंडळाचे सरचिटणीस राजेश चाळके यांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचेही कार्य अविरत सुरु असते.

मंडळाच्या वतीने एक चांगल्या प्रतीची २०२१ ची दिनदर्शिका तयार करण्यात आली. या दिनदर्शिकेचे प्रकाशन दिनांक १७ जानेवारी २०२१ रोजी मुंबईच्या महापौर किशोरी ताई पेडणेकर यांच्या हस्ते महापौर निवासस्थानी करण्यात आले.

याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष मंगेश चाळके, सरचिटणीस राजेश चाळके, खजिनदार सुरेंद्र चाळके, कार्याध्यक्ष नितीन दळवी, संतोष घोसाळकर, स्वप्नील चाळके, मार्गदर्शक विजय चाळके, महिला मंडळ सरचिटणीस प्रियांका चाळके, उपाध्यक्षा विनिता चाळके, विजेता चाळके, माधवी चाळके, माधवी चाळके, सुकन्या घोसाळकर, नंदिनी चाळके, नंदिनी चाळके ग्रामस्थ, महिला मंडळ आणि मान्यवर उपस्थित होते. प्रकाशन प्रसंगी आपल्या मनोगतात महापौर किशोरीताई पेडणेकर यांनी मंडळाच्या सर्व सदस्यांचे कौतुक करताना मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

कुडतु डी सारख्या ग्रामिण आणि डोंगराळ भागातील ग्रामस्थ नोकरीनिमित्त मुंबईत राहून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात या पेक्षा कोणते मोठेपण असू शकेल असा विश्वास किशोरीताई पेडणेकर यांनी व्यक्त करताना गावाच्या विकासासाठी लागणारे सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.

साळाव जे.एस.डब्ल्यू.कंपनीच्या पत्राला वाटाण्याच्या अक्षता? रस्त्यावरील उभी वाहने अपघाताला आमंत्रण

दै.रायगड नगरी । कोर्लई

उद्योग क्षेत्रात अग्रेसर असलेल्या जे.एस. डब्ल्यू.कंपनीच्या मुरुड तालुक्यातील साळाव येथे असणाऱ्या कंपनीने सन्मित्र वाहतूक संघटनेला माल वाहतूक करणारी वाहने ही कंपनीच्या बाहेर असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर उभी करून वाहतुकीला होणारा अडथळा दूर करण्याबाबत सहकार्य करण्यासंदर्भात दिलेल्या पत्राला वाटाण्याच्या अक्षता दाखविल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

याबाबत जेसडब्ल्यू कंपनीने सन्मित्र वाहतूक संघटनेला दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सदर वाहने ही रस्त्यावर उभी न करता ती वाहने कंपनीच्या मालकीचे चेहेर येथे असलेल्या वाहनतळ येथे उभी करण्यात यावीत.

साळाव येथील कंपनी मधून माल वाहतुकीसाठी येणारी अवजड वाहने रस्त्यावर उभी करीत असल्यामुळे अन्य वाहनचालकांना व स्थानिक नागरिकांना डोकेदुखी ठरत असून वेळप्रसंगी अप-घाताची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून जे.एस.डब्ल्यू. कंपनीमध्ये मालाची ने-आण करण्यासाठी स्थानिकांसहित अन्य ठिकाणी असलेल्या वाहन चालक मालक यांची वाहने याठिकाणी ये-जा करीत असतात. काही वेळा ही वाहने कंपनीच्या गेट पासून काही अंतरावर प्रसिद्ध विक्रम विनायक मंदिर उभी असतात. या मंदिरात अनेक पर्यटक हे मोठ्या संख्येने येत असतात. त्यावेळी रस्त्यावर उभी असणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वी सुद्धा या परिसरात दोन ते तीन वेळा अपघात होऊन जीवित हानी सुद्धा झालेली आहे. याबाबत कंपनीने पत्र काढून सुद्धा सन्मित्र वाहतूक संघटना कोणतीच कारवाई का करीत नाही असा सवाल उपस्थित होत असून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शिरवली येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे तालुक्यातील शिरवली या गावी गावचे माजी पोलिस पाटील स्व.विठोबा तुकाराम पोटफोडे यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्याचे निमित्ताने शनि. दि.२३ व रवि. दि.२४ रोजी त्यांच्या निवासस्थानी विविध धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी पोलिस पाटील तथा तालुका पो.पाटील संघाचे माजी अध्यक्ष, द.ग.तटकरे यांचे विश्वासू सहकारी म्हणून विशेष ओळख असणाऱ्या स्व.माजी पोलिस पाटील विठोबा तुकाराम पोटफोडे यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्याचे औचित्य साधून त्यांच्या परिवाराचे वतीने शनि. दि.२३ रोजी सायं.६ वा.प्रसिद्ध दत्त सेवि मंडळ वरप-पेण यांचे संगितमय हरिपाठ, रात्रौ ९ वा.नवतरुण मित्रमंडळ खांब पंचक्रोशी यांचे जागर भजन तर रवि.दि.२४ रोजी स.९ ते १० वा. पुण्यस्मरण,१० ते १२ प्रसिद्ध युवा किर्तनकार ह.भ.प.गणेशमहाराज शिगवण, खेड यांची हरिकिर्तन सेवा व तद्नंतर महाप्रसाद आदी कार्यक्रम संपन्न होणार असून या सर्व कार्यक्रमांचा लाभ पंचक्रोशीतील तमाम भाविक भक्तांनी घ्यावा असे अवाहन पोटफोडे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रादेशिक परिवहन प्रशिक्षण केंद्राच्या ब्रेक टेस्ट ट्रॅकसाठी माणगाव तालुक्यातील मौजे जावळी येथील जागा हस्तांतरण कार्यवाही पूर्ण

काम लवकर सुरु करण्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे संबंधितांना निर्देश

दै.रायगड नगरी । अलिबाग

माणगाव तालुक्यातील जावळी येथे प्रादेशिक परिवहन प्रशिक्षण केंद्रासाठी ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधणीसाठी राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर महिन्यात मंत्रालयात बैठक संपन्न झाली होती.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने मौजे जावळी, ता. माणगाव येथील गट क्र. ७३ क्षेत्री ९.१२.०० हे.आर. मधील २.००.०० हे.आर. जागा उप प्रादेशिक परिवहन कर्यालय, पेण यांनी ब्रेक टेस्ट ट्रॅक व इमारतीसाठी महसूल मुक्त सारामाफीने हस्तांतरण करण्यास मंजूरी दिलेली होती. परंतू या जमिनीमध्ये ब्रेक टेस्ट ट्रॅक बसत नसल्यामुळे माणगाव तालुक्यातील जावळी येथे सुधारित जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार जावळी येथील सर्व्हे नं. ७३ येथील एकूण ९.१२.०० हे.आर. क्षेत्रापैकी १.३०.०० हे.आर. व सर्व्हे नं. १७ येथील एकूण ०.८६.५० हे.आर. क्षेत्रापैकी ०.७०.०० हे.आर. क्षेत्र जमीन शासनाकडे पुर्नग्रहीत करण्यात आली असून ही जमीन प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांना ब्रेक टेस्ट ट्रॅक करिता हस्तांतरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांचेकडून २५० द ६ मीटर्स आकाराचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधणे, भूखंड विकसित करणे, आवार भिंतीचे बांधकाम, बांधीव गटार बाधंकाम, ब्रेक टेस्ट ट्रॅक व्यतिरिक्त उर्वरीत जागेत पेव्हरब्लॉक पार्किंग बांधकाम, ब्रेक टेस्ट ट्रॅकवर कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांची व्यवस्था, विद्युतीकरण व अनुषंगिक बाबींची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

ह्युंडाई गाडीतून लॅपटॉपसह इतर मालाची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

ह्युंदाई गाडीच्या काचा फोडून अज्ञात चोरट्यांनी लॅपटॉपसह रोख रक्कम व इतर ऐवज चोरुन नेल्याची घटना तालुक्यातील शेडुंग फाटा येथे घडली आहे.

महेंद्र शिंदे व त्यांचे सहकारी यांनी त्यांची ह्युँडाई आय टेन गाडीमध्ये ठेवलेले लॅपटॉप, रोख रक्कम व इतर महत्त्वाची कागदपत्रे अज्ञात चोरट्यांनी गाडीच्या मागच्या दरवाजाच्या काचा फोडून चोरून नेली.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पालीतील शाम राऊत या एटीएम सुरक्षा रक्षकाचा प्रामाणिकपणा

महिलेचे पिन नंबरसह हरविलेले एटीएम कार्ड केले परत

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील पालीतील स्टेट बँक ऑफ इंडिया एटीएमचा सुरक्षा रक्षक संदेश उर्फ शाम राऊत याने महिलेचे पिन नंबरसह हरविलेले एटीएम कार्ड नुकतेच त्या महिलेला परत केले आहे. आजच्या जमान्यात जे आपलं नाही ते देखील हिसकावून घेण्याची प्रवृत्ती वाढली आहे. अशातही शामने प्रामाणिक पणा दाखवून सर्वांसमोर आदर्श ठेवला आहे. शामच्या या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सुधागड तालुक्यातील अडुळसे येथील अंगणवाडी सेविका मनिषा मनोहर पोंगडे यांचे पिनकोड सह एटीएम कार्ड हरविले होते. एटीएम कार्ड असलेल्या अकाउंटमध्ये तब्बल १ लाख ५० हजार रुपये होते. हे एटीएम कार्ड सुरक्षारक्षक संदेश उर्फ शाम राऊत यांना सापडले. संदेश उर्फ शाम या इमानदार सुरक्षारक्षकाने त्या महिलेस संपर्क करून लागलीच हे एटीएम कार्ड दिले. याबद्दल मनीषा पोंगडे यांनी शाम यांचे आभार मानले. संदेश उर्फ शाम हे पाली येथील स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत मागील दहा वर्षापासून प्रामाणिकपणे काम करत आहेत.

श्रीवर्धनमध्ये महिन्यानंतर कोरोनाचा शिरकाव

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धन तालुक्यात मागील महिनाभरात एकही रुग्ण सापडला नाही. सद्या नव्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्वत्र काळजी घेण्यात येत आहे. मात्र, अचानक रुग्ण सापडल्याने श्रीवर्धनकरांची चिंता वाढली आहे. श्रीवर्धनमधील नव्याने मिळालेल्या कोरोना चाचणी अहवालानुसार जसवली येथे एक कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण आढळला आहे. आता बाधित कोरोना रुग्णांची संख्या ४४० आहे. यामधील ४१८ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. आतापर्यंत येथे २१ जणांचा मृत्यू झाला आहे. सद्य:स्थितीत उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या एक आहे. डिसेंबर च्या १६ तारखेनंतर श्रीवर्धन तालुका कोरोना मुक्त झाला असताना जसवली येथे रुग्ण सापडल्याने तालुक्यातील कोरोनाचा विळखा सुटला नाही.

मा.भाकरे साहेब कोर्ट

अॅड.रजनी गोवारी

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७४१/२०२०

नि.नं.८/ड

ने.ता.१२/०२/२०२१

चारुबाला मिलानो अनुनसिओ व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार क्रं.१ चे पती व अर्जदार क्रं.१ चे वडील मिलानो अनुनसिओ जॉन यांचे निधन दि.१८/०५/२०१९ रोजी खारघर येथे झाले आहे.

मृत्यूसमयी मिलानो अनुनसिओ जॉन यांच्या नावावर खालील शेअर्स व कॅनरा बँकेचे एक खाते होते.

वरील प्रमाणे अर्जदार हेच मयत मिलानो अनुनसिओ जॉन यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते.

त्यासाठी प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने अशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : १६/०१/२०२१

ठिकाण : पनवेल

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील श्री.विशाल अनंत मुंडकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८५२/२०२०

नि.नं.८/ड

ने.ता.२४/०२/२०२१

१) श्री.पंढरीनाथ अंबाजी भगत
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.रमेश अंबाजी भगत
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.नरेश अंबाजी भगत
वय : ४४ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.मु.पो.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदारांचे वडील अंबाजी धर्मा भगत हे दि.०८/१२/१९८६ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत अंबाजी धर्मा भगत यांच्या मालकीच्या खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेल्या आहेत. त्यांचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

संपादीत मिळकतीचे वर्णन

मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील

अ.क्र.	युनिट केस नं.	सर्व्हे क्र.	हि.क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	कामोठे-१९२/डी	१९८	१ क	०-१०.९

आता वर नमूद मिळकत व सदर मिळकतीचे संपादनापोटी साडेबारा टक्के भूखंड योजनेप्रमाणे मिळणारा भूखंड व इतर लाभ अर्जदारांस मिळण्याकरिता त्यांनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत अंबाजी धर्मा भगत यांचे वारस असल्याबाबत घोषित करून त्याप्रमाणे अर्जदारांचे नावे वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९ माहे १ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.श्री.भाकरे सो.कोर्ट साहेब

प्रो.जमा रु.५०/- — अर्जदार तर्फे वकील अॅड.कैलास ना.घरत

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३७/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.३०/०३/२०२१

१) श्रीमती.अंजली विवेक वेंगुर्लेकर
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विकास विवेक वेंगुर्लेकर
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
३) दिपा विवेक वेंगुर्लेकर
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व अर्जदार क्र.१ ते ३ रा.फ्लॅट नं.०५,
अनुराधा को.हौ.सो.प्लॉट नं.१८, सेक्टर नं.०१,
महात्मा स्कूल ग्राऊंड समोर, खांदा कॉलनी,
न्यू पनवेल, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ही कै.विवेक वसंत वेंगुर्लेकर यांची पत्नी आणि अर्जदार क्र.२ व ३ कै.विवेक वसंत वेंगुर्लेकर यांची मुले आहेत. कै.विवेक वसंत वेंगुर्लेकर यांचा मृत्यू दि.१३/०५/२०२० रोजी जे.जे.हॉस्पिटल मुंबई महाराष्ट्र येथे झालेला आहे. त्यांच्या पश्चात अर्जदारांची वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै.विवेक वसंत वेंगुर्लेकर हे हयात असताना त्यांच्या मृत्यू समयी त्यांचे मालकी हक्कात असलेली मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत आहे.

निवासी मिळकतीचे वर्णन

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील

मौजे	सेक्टर	प्लॉट नं.	बिल्डींगचे / सोसायटीचे नाव	निवासी सदनिका क्र.	मजला	क्षेत्र चौ.मी.
पनवेल	०१	१८	अनुराधा सी.एच.एस.	०५	२ रा मजला	९४.७१३ चौ.मी.

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.१९/०१/२०२१ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

प्रोसेस जमा ५०/- — अर्जदाराचे वकील श्री.राजीव कुमार गुप्ता

जाहीर नोटीस

ठाणे येथील सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५२/२०२१

नि.नं.७

१) मोहमद इकबाल खान
(MOHAMMED IQBAL KHAN)
रा.आर.एच.४, एल-१४, प्लॉट नं.९/एल, सेक्टर ९,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ (RH IV, L-14,
Plot No.9/L, Sector-9 C.B.D.Belapur)
२) फरहीन इरफान शेख
(FARHEEN IRFAN SHAIKH)
रा.आर.एच.४, एल-१४, प्लॉट नं.९/एल, सेक्टर ९,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ (RH IV, L-14,
Plot No.9/L, Sector-9 C.B.D.Belapur) — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यात येते की, कै.बिल्कीस अब्दुल जब्बार खान उर्फ बिल्कीस जब्बार खान (LATE BILQISS ABDUL JABBAR KHAN Alias BILQUISS JABBAR KHAN) रा.आर.एच.४, एल-१४, प्लॉट नं.९/एल, सेक्टर ९, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ (RH IV, L-14, Plot No.9/L, Sector-9 C.B.D. Belapur) यांचे तारीख २६/०५/२०१३ रोजी सहस्त्रबुद्धे रुग्णालय-पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून उपरोक्त अर्जदार यांनी मयत कै.बिल्कीस अब्दुल जब्बार खान उर्फ बिल्कीस जब्बार खान (LATE BILQISS ABDUL JABBAR KHAN Alias BILQUISS JABBAR KHAN) यांचे नावे मौजे : सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई, जि.ठाणे हद्दीत असणारी मालमत्ता :-

अ. क्र.	गाव	रो हाऊस नं.	प्लॉट नं.	सेक्टर	क्षेत्रफळ
१	सी.बी.डी. बेलापूर (C.B.D. Belapur)	आर.एच.४, एल-१४, (RH IV, L-14)	९/एल 9/L	९ (Sector-9)	९७.१८८ स्क्वेअर मीटर एरिया (जी+१) (97.188 Sq. Meter (G+1))

या मिळकतीच्या हक्कपत्रकी नावे दाखल होण्यासाठी ते कै. बिल्कीस अब्दुल जब्बार खान उर्फ बिल्कीस जब्बार खान (LATE BILQISS ABDUL JABBAR KHAN Alias BILQUISS JABBAR KHAN) यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणारा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. तरी असा वारस दाखला अर्जदार यांचे लाभात देण्यास कोणाची हरकत असेल तर त्यांनी दि.२६/०२/२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.ठाणे येथील सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर ठाणे यांचे न्यायालयात उपस्थित राहून हरकत नोंदवावी. कोणाची हरकत न आल्यास अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आज दि.१९ माहे ०१ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, ठाणे — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, ठाणे

मा.बहिर सो. कोर्ट

अॅड.भुषण मोरेश्वर म्हात्रे, पनवेल अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.८४२/२०२०

नि.नं.८/ड

ने.ता.२५/०२/२०२१

कै.रोहिदास वामन म्हात्रे मयतचे वारस
१) श्रीमती.अंजली रोहिदास म्हात्रे
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रोशन रोहिदास म्हात्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : व्यापार
३) सौ.वृणाली विवेक साळवे
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.२०३, विठोबा सोसायटी,
प्लॉट नं.२३८/२४३, सेक्टर १०,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) कु.वृषाली रोहिदास म्हात्रे
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
१, २ व ४ रा.पी एल ५/१, रुम नं.७,
सेक्टर १७, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.रोहिदास वामन म्हात्रे यांचे दि.१९/०६/२०२० रोजी पी एल ५/१/७, सिडको कॉलनी, सेक्टर १७, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांची आई कै.हिरीबाई वामन म्हात्रे यांचे निधन दि.२९/१२/१९९७ रोजी राहत्या घरी नवीन पनवेल, सेक्टर १७ येथे निधन झाले आहे. श्रीमती.अंजली रोहिदास म्हात्रे, वगैरे ह्यांनी कै.रोहिदास वामन म्हात्रे यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

शॉप नं.१, क्षेत्र २०.६५ चौ.मी. (बिल्टअप एरिया)
तळ मजला, जनता बाजार, सेक्टर १३, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
सदर सदनिकेची एकूण किंमत रु.४,००,०००/-
(अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र)
पी एल ५/१, रुम नं.७, सेक्टर १७,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
सदर सदनिकेची एकूण किंमत रु.३,११,०००/-
(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख एकरा हजार मात्र)

वरील मिळकत ही कै.रोहिदास वामन म्हात्रे यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.अंजली रोहिदास म्हात्रे, वगैरे हे कै.रोहिदास वामन म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.अंजली रोहिदास म्हात्रे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.रोहिदास वामन म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१९/१/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

मोटर सायकलची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

तालुक्यातील आजीवली येथील यशवंत गायकर यांच्या चाळीसमोर समोर उभी करून ठेवलेली हिरो होंडा मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

फुलसिंग भण्डारी यांच्या मालकीची दहा हजार रुपये किंमतीची मोटारसायकल यशवंत गायकर यांच्या चाळीसमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी ती मोटरसायकल चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे.

टायगर फोर्स तर्फे ठाणे-यशस्वीनगर येथे ओळख-नियुक्तीपत्र वाटप

दै.रायगड नगरी । कोर्लई

सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय भ्रष्टाचार निरोधक एवं अत्याचार विरोधी टायगर संस्थान (टायगर फोर्स) एन. जी. ओ. तर्फे ठाणे(पश्चिम)यशस्वीनगर-ढाकोळीरोड येथील कल्पवृक्ष गार्डन येथे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना ओळख व नियुक्ती पत्र देण्यात आले.

टायगर फोर्स चे राष्ट्रीय उपाध्यक्ष (ट्रस्टी)हरिराम मिश्रा, राष्ट्रीय महासचिव बडेबाबू सिंग, राष्ट्रीय महासचिव विक्रांत राऊळ, राष्ट्रीय सचिव हनुमंत नेमिष्टे, महाराष्ट्र महासचिव संदीप चौरासिया मुख्य अतिथी म्हणून तर विशेष अतिथी महाराष्ट्र अध्यक्ष भालचंद्र नलावडे, निमंत्रक ठाणे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद कोलते , महासचिव प्रशांत पडवळ यावेळी उपस्थित होते. टायगर फोर्स च्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून योगदान देणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील आठ व्यक्तिंना यावेळी मान्यवरांच्या हस्ते ओळख व नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विक्रांत राऊळ यांनी तर प्रशांत पडवळ यांनी आभार मानले.

अखेर त्या जखमी बैलाचे प्राण वाचले

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

मागील काही दिवसांपासून पालीमध्ये एक बैल जखमी अवस्थेमध्ये फिरत आहे. हा बैल रविवारी (ता.१७) पालीतील एकता पथ येथे आला होता. येथील माजी ग्रामपंचायत सदस्य भास्कर दुर्गे यांनी या बैलाला खाण्यासाठी चारा व पाणी दिले. या बैलावर लागलीच उपचार व्हावे यासाठी रात्री पशुवैद्यकीय कर्मचारी सुभाष जाधव यांना बोलावण्यात आले. त्यानंतर स्थानिकांच्या मदतीने बैलावर वेळीच उपचार करून त्याचा जीव वाचविण्यात यश आले. या बैलाच्या पायाला जखम होऊन त्यात किडे झाले होते. त्यामुळे त्यास चालणे अवघड झाले होते. तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रशांत कोकरे यांना जखमी बैलाची माहिती मिळताच त्यांनी कर्मचारी सुभाष जाधव यांना घटनास्थळी बैलावर उपचारासाठी पाठविले. यावेळी जाधव यांच्यासह स्थानिक नागरिक ज्ञानेश्वर जगताप, सुलतान बेनसेकर, नचिकेत सावंत, भास्कर दुर्गे व ओशेर चिंचोलकर यांनी मेहनत घेऊन बैलाची जखम साफ करून त्याला इंजेक्शन दिले आणि बैलाचे प्राण वाचविले.

प्रगतीबरोबरच समाजाचे अस्तित्व टिकविण्याची गरज ; आगरी वकील-डॉक्टर परिषदेत एकसूर

दै.रायगड नगरी । पेण

आगरी समाजाला सरस्वतीचे दर्शन फार उशिरांनी झाले असले तरी त्यांनी एकलव्याप्रमाणे नकळत विद्याग्रहण केली आहे. प्रगतीची नवनवी क्षितिजं पादाक्रांत केली आहेत. आज समाजात शिक्षणाचा प्रसार मोठ्याप्रमाणावर झाला आहे. आर्थिकदृष्ट्याही तो बऱ्यापैकी संपन्न होऊ लागला आहे. ही एक समाधानाची बाब असली तरी दुसऱ्या बाजूला मात्र भयंकर विदारक परिस्थिती पहायला मिळत आहे.

वाढू लागलेला पाशवी औद्योगिक विकास, आणि उभ्या राहिलेल्या अजस्र नागरी वसाहती, यामुळे परप्रांतीयांच्या भाऊगर्दीत आगरी माणूस चिरडून जाऊ लागला आहे. मुंबई, नवी मुंबई, तिसरी मुंबई, नैना, स्वप्ननगरी अशा विविध प्रकल्पांच्या माध्यमातून सरकारकडून मूळनिवासी असलेल्या आगरी माणसालाच सातत्याने विस्थापित करण्याचे कारस्थान रचले जात आहे.

आस्ते-आस्ते पर्यावरणाचा हवाला देऊन मॅग्रोजचे भूत मानगुटीवर बसवून आगरी शेतकऱ्यांला भूमिहीन केले जात आहे. इतकेच नव्हे तर बाहेरुन आलेल्यांच्या अनधिकृत झोपड्यांना वारंवार संरक्षण दिले जात असताना आमच्या गरजेपोटी बांधलेल्या घरांवर मात्र बेधडकपणे हातोडा मारला जात आहे. इतरांना आरक्षणाच्या आक्षता वाटल्या जात असताना आमच्या तोंडाला नुसती पानेच पुसली जात नाहीत तर साधी दखलही घेतली जात नाही. सत्तेच्या भागीदारीत तर आमचे स्थान शून्य राहिले आहे. या सगळ्या परिस्थितीचा विचार करता आगरी माणसाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. म्हणून समाजाचे नामोनिशाण मिटविण्याऱ्या, त्यांना देशोधडीला लावणाऱ्या, त्यांना उध्वस्त करणाऱ्या प्रवृत्तींविरुध्द आपण आजच संघटित झालो नाहीत तर भविष्यात समाजाला फार मोठी किंमत मोजावी लागेल. असा धोका दाखविणारा एकसूर पेण येथे झालेल्या आगरी वकील-डॉक्टरांच्या परिषदेत उमटला आहे.

अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेच्या वतीने पेण येथील आगरी समाज सभागृहात आगरी वकील-डॉक्टरांची संयुक्त परिषद आयोजित करण्यात आली होती. या विचारमंथन परिषदेत वकील-डॅक्टरांनी समाजाच्या अधोगतीची साधार भीती व्यक्त केली. अनेक उणिवांची, विविध समस्यांची, नाना प्रश्नांची उकल होणे काळाची गरज आहे. असे मत देखील त्यांनी व्यक्त केले. सर्वच समाज एकसंघ झाले असून, ते आपापल्या मागण्यांसाठी झगडत आहेत. मात्र एकमेव आगरी जात तेवढी अजूनही निद्रीत आहे. त्यांनी वेळीच जागे झाले नाही तर पुलाखालून पाणी वाहून गेल्यावर आदळआपट करण्यात काही अर्थ उरणार नाही. अशी सादही त्यांनी यावेळी समाजबांधवांना घातली आहे.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत पाटील हे होते. तर उद्घाटन अलिबागच्या आदर्श पतसंस्थेचे चेअरमन सुरेश पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी माजी न्यायाधीश डी.पी.म्हात्रे, पेण बार असोसिएशनचे अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे, पेण मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष सचिन नाईक, समाजसेवी डॉक्टर सिध्दार्थ पाटील, भिवंडीचे आगरी कोळी मेडिकोजचे डॉ.तपन पाटील, अलिबागचे डॉ.विनायक पाटील, डॉ.महानंदा म्हात्रे, ॲड. स्मिता धुमाळ, ऍड.पुष्कर मोकल, डॉ.तुषार गावंड, सुरेश पाटील, संजय ठाकूर, ॲड. राजश्री गावंड, ॲड. के.एस.पाटील आदी अनेक वकील-डॉक्टरांनी आपले मनोगतं व्यक्त केली.

भेंडखळ गावात राममंदिर अभियानाची शोभा यात्रा संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

नुकताच उरण तालुक्यात भेंडखळ गावात श्री राम मंदिर निर्माण अभियानाची उत्साहात सुरवात राम नाम शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानाचे उरणचे प्रमुख दर्शन पाटील, मिलींद पाटील, मनिष पाटील, संजय ठाकूर यांनी नियोजन केले. त्यात उत्साहाने सहभागी न्युनणकेश्वर भजन मंडळाचे किशोर भोईर, जितेंद्र भोईर तसेच ग्रामपंचायत सदस्य रतन ठाकूर तर पालवी सामाजिक संरथेचे चंदविलास घरत, समीर भोईर, लक्ष्मण ठाकूर तसेच जनाई हरिपाठ भजन मंडळाचे सौ. सिमा ठाकूर ह.भ.प. प्रभाकर ठाकूर तर वाद्यवृंद मंगळाष्के प्रमुख काशीनाथ पाटील, मंगेश घरत तसेच मुक्ताई बचत गटाच्या प्रमुख सौ. मिनल म्हात्रे तसेच बहीरीदेव बचत गटाच्या प्रमुख सौ.भायश्री पाटील तर राधे राधे बचत गटाच्या सौ. मथुरा ठाकूर, माऊली गटाच्या सौ.दिपिका ठाकूर अन्नपुर्णा महिला गटाच्या सौ. नंदा नागावकर, सौ.मानिबाई भगत, जरीमरी आई नवरात्रौत्सवाचे प्रमुख किरण घरत, तुषार ठाकूर मनसे तालुका अध्यक्ष राकेश भोईर आदर्श कामगार भुषण प्रांजल भोईर तसेच खोपटा अभियान मंडळ प्रमुख सचिन पाटील चिरनेर मंडळ प्रमुख श्रीपाद कातरणे तर केळवणे मंडळ प्रमुख चेतन पाटील व सचिन केदारी आदि प्रमुखांच्या उपस्थितीत शोभा यात्रा पार पडली.

राही सामाजिक संस्था आणि नवनाथ मंदिर पनवेल यांचा अभिनव उपक्रम

दै.रायगड नगरी । पनवेल

समाजात काम करीत असताना आपणही समाजाचे काही तरी देणे लागतो ही भावना जपणारी अनेक सामाजिक संस्था अगदी हीरहीरीने झोकुन आप आपल्या परीने काम करीत असतात.

पनवेल मधील राही सामाजिक संस्था आणि श्री नवनाथ मंदीर पनवेल यांच्या सयुक्त विद्यमाने पनवेल रेल्वे स्थानका जवळील सुमारे २०० परीवाराला धान्य किट चे वाटप नुकतेच करण्यात आले. नवनाथ मंदीर पनवेल यांच्या वतीने लॉकडाऊन मध्ये ही येथील गोरगरीबांना त्या वेळी मदतीचा हात दिला होता तसाच मदतीचा हात पुन्हा देण्यात आल्याने येथील रहिवाश्यांमध्ये आनंद व्यक्त होत होता. या वेळी प्रशांत शिवजी भट, विजय महाराज पानसरे, नंदकुमार मांडरे, संतोष कुंभार, दत्ताञेय भगत आदी उपस्थित होते.

प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबीर

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर यांच्यामार्फत मोफत आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबीराचा अनेक नागरिकांनी लाभ घेतला. या आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबीराला नगरसेविका सारिका भगत, माधुरी गोसवी, कुमार ठाकूर व इतर सहकाऱ्यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली. या शिबिरात आजारांची मोफत तपासणी करुन तज्ज्ञांकडून मोफत सल्ला देण्यात आला. या शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून विरोधी पक्षनेते प्रितम दादा जनार्दन म्हात्रे उपस्थित होते. सदर आरोग्य शिबिर यशस्वी होण्यासाठी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिष्यवृत्तीत पहिला आलेल्या कु. प्रबोधचे खासदारांनी केले कौतुक

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

रायगड रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनिल तटकरे यांनी माणगांव येथील कुमार प्रबोध दत्ताराम शिर्के या पाचवीत शिकणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत इयत्ता पाचवी सन २०२० मध्ये घवघवीत यश संपादन करुन रायगड जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविल्या बद्दल, सुतारवाडी येथे बोलावुन सोमवार दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता अभिनंदन करुन खासदारांनी शुभेच्छा पत्र व पुष्पगुच्छ देऊन पुढील शिक्षणासाठी प्रबोध याच्या पाठीवर शाबासकीची थाप देत गौरवान्वित केले आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे माणगांव तालुकाध्यक्ष सुभाष केकाने, उणेगावचे सरपंच राजु शिर्के तसेच प्रबोधचे वडिल दत्ताराम शिर्के गुरुजी यांची उपस्थिती होती. अतिशय सालस आणि शांत गुणी विद्यार्थ्याचे अशा प्रकारे कौतुक झाल्याने प्रबोधच्या पालकांनी समाधान व्यक्त केले असुन माणगांवकरांनाही त्याचा अभिमान वाटत आहे. प्रबोधने आपल्या गावचे तसेच शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. त्याच्या या यशामुळे इतर शालेय विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन मिळणार असुन सर्वांना प्रबोधचे कौतुक वाटत आहे.

बर्ड फ्लू मुळे ग्राहक कोरोना विसरले; ग्राहकांची चिकन खरेदीकडे पाठ तर मासळी बाजारात मात्र उच्चाकी गर्दी

दै.रायगड नगरी । पनवेल

नव्याने सुरु असलेल्या बर्ड फ्लू संसर्गाच्या चर्चे मुळे पनवेल परिसरातील ग्राहक कोरोनाची भीती विसरल्याचे चित्र पनवेल परिसरातील मासळी बाजारात उसळलेली गर्दीमुळे पाहायला मिळाले असून, हवामानात झालेल्या बदलामुळे मासळीचे दर वाढलेले असून देखील मासळी खरेदी करण्यासाठी खवाय्यानी मासळी खरेदी करण्यासाठी केलेल्या गर्दीमुळे अनेक दिवसानंतर मासळी विक्रेत्यांना काही प्रममाणात अच्छे दिन पाहायला मिळाल्याची माहिती कळंबोली येथील मासळी विक्रेते बिपीन परशे यांनी दिली आहे.

हवामानात झालेला बदल आणि कमी प्रमाणात करण्यात येत असलेली मासे मारी या मुळे माश्यांच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने मागील काही दिवसात खवय्यांनी मासे खरेदीकडे पाठ फिरवत चिकन खरेदीला प्राधान्य दिले होते. खवयांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे परिसरातील चिकन विक्रेते देखील काही प्रमाणात सुखावले होते. कोरोना काळात जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाऊन नंतर आर्थिक अडचणीत सापडलेल्या चिकन विक्रेत्यांना अनलॉक दरम्यान ग्राहकांकडून मिळत असलेल्या प्रतिसादा बाबत समाधान व्यक्त केले जात असतानाच अचानक उद्भवलेल्या बर्ड फ्लू मुळे परिसरातील खवयानी चिकन खरेदी कडे पाठ फिरवत महाग झालेल्या मासे खरेदीला प्राधान्य दिल्याने पनवेल परिसरातील मासे बाजारात रविवारी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले असून, बाजरपेठेत झालेल्या गर्दीमुळे नागरिकांमधील कोरोनाची भीती संपुष्टात आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माश्यांच्या दरात वाढ

हवामानात झालेल्या बदलावामुळे मासे मिळणं अवघड झाले असल्याने कमी प्रमाणात मासे बाजारात उपलब्ध होत असल्याने किरकोळ बाजारात माश्याच्या दरात वाढ झाली असून काही दिवसापूर्वी १५० रुपये किलो दाराने मिळणारे बोंबील २०० रुपये किलोने विकले जात आहेत तर २०० रूपये किलो दराने विकला जाणारा बांगडा २५० रूपये किलो, ४५० रुपूये किलो दराने बिकली जात असलेली छोटी सुरमई ६०० रूपये,६५० रूपये किलोची मोठी सुरमई ८०० रूपये तर ६०० रूपये किलो दाराने विक्री होणारे पापलेट ८०० रूपये आणि ४०० रूपये किलो दराने विकली जाणारी कोळंबी ५०० रूपये किलो दराने विकली जात आहे.

चिकनचे दर घसरले

खवय्यांनी चिकन खरेदीकडे पाठ फिरवल्याने पनवेल परिसरात चिकनचे दर १६० ते १८० वरून १०० रुपयांवर उतरवले आहेत.

तळा तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष नारायण उर्फ नाना भौड याची नियुक्ती

दै.रायगड नगरी । तळा

खासदार सुनिल तटकरे, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे, यांच्या कृपा आशीर्वादाने तळा तालुका नवनिर्वाचित अध्यक्षपदीनारायण उर्फ नाना भौड यांची निवड करण्यात आली.

सुतारवाडी येथे झालेल्या जिल्हा कार्यकारणी व प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत नियुक्ती पत्र दिले. यावेळी तळा तालुका माजी ता. अध्यक्ष नथुराम अडखळे, महिला व बालकल्याण सभापती गिताताई जाधव, सभापती अक्षरा कदम, जि.प.सदस्य बबन चाचले, उपसभापती गणेश वाघमारे, पंचायत समिती सदस्य सौ.देवकि लासे, तालुका अध्यक्षा सौ.जान्हवीताई शिंदे, तळा नगरसेवक चंद्रकांत रोडे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेते चंद्रकांत राऊत, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक सचिव कु. किशोर शिंदे, युवक अध्यक्ष कु. नागेश लोखंडे, संदेश काते उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष नाना भौड माजी सभापती, उपसभापती, सदस्य, अशी पंचायत समितीची पदे भुषवली आहेत. तसेच पढवण हायस्कूल चे विद्यमान अध्यक्ष असून राष्ट्रवादी पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत शांत, सुस्वभावी व्यक्तीमत्व, प्रशासकीय कामकाज हाताळण्याची व तळागाळातील जनतेपर्यंत शासकीय योजनाचा विकास करण्यात अग्रेसर आहेत त्यांच्या कारकिर्दीत अनेक विकासकामे खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून केली आहेत.

पक्ष संघटना वाढविणे मजबूत करणे याकामी अग्रेसर असल्याने तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी मोठ्या विश्वासाने सोपवली आहे. माजी अध्यक्ष नथुराम अडखळे यांनी वयोमानानुसार व स्वखुशीने राजिनामा दिला असल्याने याची नियुक्ती करण्यात आली आहे. असे अधिकृत वृत्त समजते. यांच्या नियुक्तीने राष्ट्रवादी पक्षात नव चैतन्य व आनंदी वातावरण पसरले आहे. नाना भौड यांना सौ.अक्षरा सचिन कदम सभापती पंचायत समिती तळा यांनी खास अभिनंदन केले. पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा दिल्या असून यांचे सर्व स्तरावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

हुतात्मा हिराजी पाटील यांची जयंती साजरी

दै.रायगड नगरी । माथेरान

वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या आझाद दस्त्यातील विश्वासू सोबती हुतात्मा हिराजी पाटील यांची जयंती नगरपरिषदेच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. सकाळी अकरा वाजता माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांच्या हस्ते हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित नगरपरिषदेच्या कर्मचारी वर्गाने, लोकप्रतिनिधीनी अभिवादन केले.

यावेळी नगरसेविका सोनम दाभेकर, कीर्ती मोरे, ज्योती सोनावले,सामाजिक कार्यकर्त्या संगीता जांभळे, समिना महापुळे नगरपरिषदेचे कार्यालय अधीक्षक रणजित कांबळे, अकाउंट लिपिक अंकुश इचके, अन्सार महापुळे,लिपिक अजय साळुंके उमेश मोरे यांसह अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होते.